**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतदान करताना भारत निवडणूक आयोगाकडील मतदार ओळखपत्र अथवा अन्य पुरावा सादर करण्याबाबत...**

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**
**क्रमांक-रानिआ/मनपा-२००९/प्र.क्र.१६/का-५.**
**नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.**
**दिनांक- ८ नोव्हेंबर, २०११.**

## आ दे श

राज्य निवडणूक आयोगाने आदेश क्रमांक-रानिआ/मनपा-२००९/प्र.क्र.१६/का-५, दिनांक-१९ डिसेंबर, २००९ अन्वये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये मतदारांची ओळख पटविण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या मतदार ओळखपत्राव्यतिरिक्त अन्य १६ कागदपत्रे सादर करण्यास परवानगी दिली होती. हे आदेश रद्द करुन त्यामध्ये आता सुधारणा करणे गरजेचे झाले असल्यामुळे पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत :-

मतदान केंद्राध्यक्षाने मतदारास आपली ओळख पटविण्याकरिता प्रथम फोटो असलेले निवडणूक ओळखपत्र सादर करण्यास सांगावे. असे ओळखपत्र सदर मतदाराकडे उपलब्ध नसल्यास किंवा त्यावरुन त्या मतदाराची ओळख पटत नसल्यास खालील पुराव्यांपैकी कोणताही पुरावा सादर करण्याची सूचना मतदान केंद्राध्यक्ष मतदारास करेल व त्यानुसार मतदाराची ओळख पटल्यानंतर मतदारास मतदान करु देईल.

१. पासपोर्ट,
२. वाहन चालविण्याचा परवाना
३. आयकर विभागाकडील पॅन ओळखपत्र
४. केंद्र शासन / राज्य शासन / सार्वजनिक उपक्रम / स्थानिक स्वराज्य संस्था यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना फोटोसहित दिलेली ओळखपत्रे
५. राष्ट्रीयकृत बँका अथवा पोस्ट ऑफिस यामधील खातेदाराचे फोटो असणारे पासबुक
६. स्वातंत्र्य सैनिकाचे फोटो असलेले ओळखपत्र
७. राज्य निवडणूक आयोगाने निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्याच्या आधीच्या तारखेपर्यंत सक्षम प्राधिकाऱ्याने अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती / इतर मागासवर्ग / विमुक्त जाती / भटक्या जमाती / विशेष मागासवर्ग प्रवर्ग इत्यादींना फोटोसहित दिलेले प्रमाणपत्र
८. राज्य निवडणूक आयोगाने निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्याच्या आधीच्या तारखेपर्यंत सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला फोटोसहित अपंगत्वाचा दाखला
९. मालमत्तेबाबतची कागदपत्रे तसेच नोंदणी खत इत्यादी (फोटोसहित)
१०. राज्य निवडणूक आयोगाने निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्याच्या आधीच्या तारखेपर्यंत फोटोसहित देण्यात आलेला शस्त्रास्त्राचा परवाना
११. राज्य निवडणूक आयोगाने निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्याच्या आधीच्या तारखेपर्यंत दिलेले राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेखालील, फोटो असलेले ओळखपत्र
१२. राज्य निवडणूक आयोगाने निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्याच्या आधीच्या तारखेपर्यंत दिलेले निवृत्त कर्मचा-यांचे फोटो असलेले पासबुक
१३. राज्य निवडणूक आयोगाने निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्याच्या आधीच्या तारखेपर्यंत दिलेले निवृत्त कर्मचाऱ्यांच्या विधवा / अवलंबित व्यक्ती यांचे, फोटो असलेले प्रमाणपत्र
१४. राज्य निवडणूक आयोगाने निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्याच्या आधीच्या तारखेपर्यंत दिलेले वयस्कर निवृत्ती वेतनधारक अथवा त्यांच्या विधवा यांचे, फोटो असलेले प्रमाणपत्र
१५. केंद्र शासनाच्या श्रम मंत्रालयाने दिलेले आरोग्य विमा योजनेचे फोटोसहित कार्ड
१६. राज्य निवडणूक आयोगाने निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्याच्या आधीच्या तारखेपर्यंत दिलेली शिधापत्रिका (कुटुंबातील सर्व मतदारांनी मतदान करण्यासाठी एकत्र येणे आवश्यक असेल. तसेच जर शिधापत्रिकेवर एकाच व्यक्तीचे नाव असल्यास त्याने स्वतःच्या वास्तव्याचा अन्य पुरावा जसे वीज वापराचे देयक, दूरध्वनी वापराचे देयक, प्रॉपर्टी कार्ड किंवा घरपट्टी भरल्याची पावती सोबत आणणे बंधनकारक राहील.)
१७. आधार ओळखपत्र

उमेदवाराच्या मतदान प्रतिनिधींनी मतदाराच्या ओळखीबाबत आक्षेप घेतल्यास किंवा मतदाराने सादर केलेल्या ओळखीच्या पुराव्याबाबत कोणत्याही प्रकारची शंका असल्यास मतदान केंद्राध्यक्ष त्याबाबत संपूर्ण शहानिशा करेल व आवश्यकता वाटल्यास इतर ओळखीच्या पुराव्यांची मागणी करुन मतदाराच्या ओळखीची संपूर्णतः खात्री पटल्यानंतरच त्यांना मतदान करु देईल. जर एखादा मतदार असा ओळखीबाबतचा समाधानकारक पुरावा /कागदपत्रे सादर करु न शकल्यास त्यास मतदान करु देऊ नये. कोणत्याही परिस्थितीत तोतया मतदाराकडून मतदान होणार नाही याची संपूर्ण जबाबदारी संबंधित मतदान केंद्राध्यक्षांची असेल.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

( ध. मा. कानेड )
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व महानगरपालिका आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)
सर्व नगर परिषदा / नगर पंचायतींचे मुख्याधिकारी
सर्व तहसिलदार
राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने

**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतदान करताना मतदार यादीतील फोटो अथवा अन्य तपशील चुकीचा असल्यास करावयाची कार्यवाही...**

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**
**क्रमांक-रानिआ/मनपा-२०११/प्र.क्र.१६/का-५.**
**नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.**
**दिनांक- ६ फेब्रुवारी, २०१२.**

## आ दे श

स्थानिक स्वराज्य संस्थांची मतदार यादी विधानसभेच्या मतदार यादीवरून तयार करण्यात येते. राज्य निवडणूक आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की विधानसभेच्या मतदार यादीमध्ये काही मतदारांच्या नावासमोर त्यांचे फोटो चुकीचे छापलेले आहेत अथवा अन्य तपशिलातही चुका आहेत. राज्य निवडणूक आयोगास सदर यादीवरून स्थानिक स्वराज्य संस्थांची मतदार यादी बनविताना त्यात सुधारणा करण्याचे अधिकार नाहीत.

यासंदर्भात राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र असे आदेश देत आहे की राज्य निवडणूक आयोगाने आदेश क्रमांक-रानिआ/मनपा-२००९/प्र.क्र.१६/का-५, दिनांक- ८ नोव्हेंबर, २०११ अन्वये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये मतदारांची ओळख पटविण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या मतदार ओळखपत्राव्यतिरिक्त अन्य १७ कागदपत्रे सादर करण्यास परवानगी दिली असून या पुराव्यांच्या आधारे ज्या मतदाराची ओळख पटत असल्याबाबत मतदान केंद्राध्यक्षांची खात्री झाल्यानंतर त्या मतदारास त्याचा मतदार यादीमध्ये फोटो अथवा अन्य तपशील चुकीचा नमूद करण्यात आला असला तरी मतदानाची परवानगी देण्यात यावी.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

( डॉ. अ. द. कोल्हे )
उप सचिव,
राज्य निवडणूक आयोग

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व महानगरपालिका आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)
सर्व नगर परिषदा / नगर पंचायतींचे मुख्याधिकारी
सर्व तहसिलदार
राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने

**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतदान करताना भारत निवडणूक आयोगाकडील मतदार ओळखपत्र अथवा अन्य पुरावा सादर करण्याबाबत...**

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**
**क्रमांक-रानिआ/मनपा-२००९/प्र.क्र. १६/का-५.**
**नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,**
**मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.**
**दिनांक- २९ मार्च, २०१०.**

**वाचा:- राज्य निवडणूक आयोगाकडील आदेश क्रमांक-रानिआ/मनपा-२००९/ प्र.क्र.१६/का-५, दिनांक- १९ डिसेंबर, २००९.**

**आ दे श**

राज्य निवडणूक आयोगाने मतदारांची ओळख पटविण्यासाठी कुठले पुरावे ग्राहय धरण्यात येतील याबाबत दिनांक- १९ डिसेंबर, २००९ रोजी आदेश काढलेले आहेत. या आदेशामध्ये शिधापत्रिका हा एकमेव पुरावा असा आहे की, ज्यावर मतदारांचे छायाचित्र नाही. त्यामुळे या पुराव्याचा दुरुपयोग होऊ नये यासाठी शिधापत्रिका हा पुरावा वापरावयाचा असेल तर कुटुंबातील सर्व मतदार एकत्रितरित्या मतदानासाठी यावयास पाहिजे अशी अट घातली आहे. परंतु, काही वेळेला कुटुंबामधील एकाच व्यक्तीचे नांव शिधापत्रिकेवर असेल तर अशावेळी मतदाराची ओळख पटविण्यामध्ये विश्वासार्हतेचा अभाव वाटू शकतो. या कारणास्तव राज्य निवडणूक आयोग असा आदेश देत आहे की, शिधापत्रिका हा पुरावा वापरावयाचा असेल व एकाच व्यक्तीचे नांव शिधापत्रिकेवर असेल तर त्याने त्यासोबत त्याच्या स्वत:च्या वास्तव्याचा अन्य पुरावा जसे की, वीज वापराचे देयक, दूरध्वनी वापराचे देयक, प्रॉपर्टी कार्ड किंवा घरपट्टी भरल्याची पावती सोबत आणणे बंधनकारक राहील.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

( रा. नी. पांडे )
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व महानगरपालिका आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)
सर्व नगर परिषदा / नगर पंचायतींचे मुख्याधिकारी
सर्व तहसिलदार
राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने

**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतदान करताना भारत निवडणूक आयोगाकडील मतदार ओळखपत्र अथवा अन्य पुरावा सादर करण्याबाबत...**

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**
**क्रमांक-रानिआ/मनपा-२००९/प्र.क्र. १६/का-५.**
**नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,**
**मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.**
**दिनांक- २ ऑगस्ट, २०१२.**

**वाचा:- राज्य निवडणूक आयोगाकडील आदेश क्रमांक-रानिआ/मनपा-२००९/ प्र.क्र.१६/का-५, दिनांक- ८ नोव्हेंबर, २०११.**

## आ दे श

राज्य निवडणूक आयोगाकडे अशा तक्रारी प्राप्त झाल्या आहेत की मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या दि. १२ ऑगस्ट, २०१२ रोजी होणा-या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये मतदाराची ओळख पटविण्याकरिता बोगस पॅन कार्ड व शिधापत्रिकेचा वापर होण्याची शक्यता आहे.

बोगस मतदारांना आळा घालण्यासाठी राज्य निवडणूक आयोग असा आदेश देत आहे की, एखाद्या मतदाराचा मतदार यादीमध्ये फोटो नसेल आणि असा मतदार मतदानासाठी ओळखीचा पुरावा म्हणून केवळ पॅन कार्ड अथवा शिधापत्रिका देत असेल आणि त्या मतदाराच्या ओळखीबाबत मतदान केंद्राध्यक्षांना अथवा मतदान केंद्रामध्ये उपस्थित मतदान प्रतिनिधी यांना शंका आल्यास त्या मतदारास त्याच्या स्वत:च्या ओळखीकरिता संदर्भाधीन आदेशामधील ओळखीबाबतचा अन्य पुरावा सादर करणे बंधनकारक राहील.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

( वि. मा. पानसरे )
सहायक आयुक्त,
राज्य निवडणूक आयोग

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व महानगरपालिका आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)
सर्व नगर परिषद / नगर पंचायतींचे मुख्याधिकारी
सर्व तहसिलदार
राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने